**स्थायी निदेश क्र. ३१**

**राज्यातील नगरपरिषदांमध्ये ज्या ठिकाणी अग्निशमन सेवा नाहीत त्या ठिकाणी अग्निशमन सेवा कार्यान्वित करणे व अस्तित्वातील अग्निशमन सेवा बळकट करणेबाबत.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**शासकीय परिवहन सेवा इमारत,**
**३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.**
**क्र: नप्रसं /अग्निशमन सेवा /२००५/प्र.क्र. ३१४/९**
**दिनांक :२५ एप्रिल, २००५**

०१. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ७६(१) नुसार नगरपरिषदेच्या आस्थापनेवर पदनिर्मितीचे अधिकार तसेच कलम ७६(२) नुसार नगरपरिषद आस्थापनेवर पदांची अर्हता, वेतन भत्ते व सेवेच्या शर्ती तसेच त्यांच्या सेवाप्रवेशाच्या पध्दती विहित करण्याचे अधिकार संचालक, नगरपरिषद प्रशासन यांना आहेत.

०२. नगरपरिषदांनी वाहने खरेदी करावयाची झाल्यास जिल्हाधिकारी यांचे मार्फत प्रस्ताव सादर करुन आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे मंजूरीने वाहने खरेदी करावीत असा शासन नगर विकास विभाग निर्णय क्र.एमयुबी ४८०३/१२३६/प्र.क्र.२६६/नवि-१९ दिनांक ४ सप्टेंबर २००३ अन्वये निर्णय घेतलेला आहे. यास अनुसरुन नगरपरिषदांनी नगरपरिषद निधीतून अथवा शासनाकडून मिळणाऱ्या इतर सर्व प्रकारचे अनुदानातून या कार्यालयाच्या पूर्व मंजूरीशिवाय नवीन वाहन खरेदी करण्यांत येवून नये असे या संचालनालयाचे परिपत्रक क्र.नपाप्र/वाहन खरेदी/२००४/ प्र.क्र.९५९/ ०४/९, दि. २९ ऑक्टोबर २००४ अन्वये सर्व नगरपरिषदांना सूचना निर्गमित केल्या आहेत.

०३. अग्निशमन सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्यामुळे ज्या नगरपरिषदांकडे अग्निशमन सेवा नाहीत, त्या ठिकाणी ही सेवा कार्यान्वित करणे व ज्या ठिकाणी त्या अस्तित्वात आहेत त्या सेवा अधिक बळकट करण्यासाठी, या सेवेतील कर्मचाऱ्यांची संख्या विहित करणे, त्यांचे कामाचे वेळापत्रक निश्चित करणे, प्रशिक्षण व अग्निशमन सेवेचे दर सुचविणे, इ. शासनाच्या धोरणानुसार तसेच अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन यांच्या शिफारशी विचारात घेऊन कार्यवाही करण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यांत येत आहेत.

## आ दे श

**अग्निशमन सेवेसाठी गाड्या**

०४. राज्यातील नगरपरिषदांमध्ये अग्निशमन विभाग बळकट करण्याबाबत अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन यांनी केलेल्या शिफारशी विचारात घेऊन राज्यातील नगरपरिषदांमध्ये अग्निशमन केंद्रासाठी आवश्यक फायर इंजिन, पोर्टेबल पंप्स इत्यादी उपकरणे पुढीलप्रमाणे अपेक्षित आहे.

**तक्ता - अ**

**लोकसंख्येनुसार अग्निशमन केंद्रासाठी आवश्यक अग्निशमन साहित्य**

| अ.क्र | वाहन | क / ब वर्ग नगरपरिषदा ३० हजार ते १ लाख लोकसंख्या असलेल्या | अ वर्ग नगरपरिषदा १ ते २ लाख लोकसंख्या असलेल्या | अ वर्ग नगरपरिषदा २ ते ३ लाख लोकसंख्या असलेल्या |
|---|---|---|---|---|
| १ | फायर इंजिन (क्षमता ४५७७ लिटर अंदाजे किंमत २१ लाख ) | १ | १ | २ |
| २ | फायर इंजिन (क्षमता ७ ते ८ हजार लिटर अंदाजे किंमत १८ लाख ) | ० | १ | १ |
| ३ | पोर्टेबल पंप (अंदाजे किंमत १.५ लाख ) | १ | २ | ३ |

०५. या स्थायी निदेशातील परिच्छेद २५ व २६ मध्ये नमूद केलेल्या व परिशिष्ट- ड मध्ये विहित केल्याप्रमाणे ज्या नगरपरिषदांनी अग्निशमन सेवा दर निश्चित केले असल्यास वरील निकषानुसार नगरपरिषदेकडे अग्निशमन गाड्या खरेदी करण्यासाठी या संचालनालयाचे परिपत्रक क्र.नपाप्र/वाहन खरेदी/२००४/प्र.क्र.९५९/०४/९, दि.२९.१०.२००४ नुसार जिल्हाधिकारी यांचे मार्फत संचालनालयाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता नाही.

अग्निशमन विभागातील जुन्या अग्निशमन गाड्या या वाहन निर्लेखित करण्याबाबत शासनाच्या धोरणानुसार नगरपरिषदेने निर्लेखित करुन विक्री केली असल्यास वरील निकषाप्रमाणे गाड्यांच्या संख्येची गणना करतांना अशा गाडया वगळता येतील.

०६. परिच्छेद ४ मध्ये विहीत केलेल्या निकषा व्यतिरिक्त नगरपरिषदेस अधिक गाड्या खरेदी करावयाच्या असल्यास खालील परिस्थितीमध्ये या संचालनालयाच्या मार्फत मान्यता देण्याचा विचार करता येईल.

अ) नगरपरिषद क्षेत्रामध्ये आगी लागण्याच्या घटना अधिक आहेत. (औद्योगिक विकास इत्यादी कारणांमुळे)

ब) भौगोलिक परिस्थिती (अग्निशमन सेवा जवळपास उपलब्ध नाही अशा ठिकाणी)

क) इतर विशिष्ट कारणामुळे (जिल्हा मुख्यालय, तीर्थस्थान इ.)

परिच्छेद ४ मध्ये विहीत केलेल्या निकषाव्यतिरिक्त नगरपरिषदेस वरील परिस्थितीमध्ये अधिक गाड्या खरेदी करावयाच्या असल्यास त्यासाठी व या निदेशातील परिच्छेद २५ व २६ मध्ये नमूद केलेल्या व परिशिष्ट- ड मध्ये विहित केल्याप्रमाणे ज्या नगरपरिषदांनी अग्निशमन सेवा दर निश्चित केले असल्यास जिल्हाधिकारी यांच्या शिफारशीसह प्रस्ताव या संचालनालयाच्या मान्यतेसाठी पाठविणे बंधनकारक राहील.

०७. ज्या नगरपरिषदेमध्ये पाणी टंचाई आहे त्यामध्ये स्थानिक परिस्थितीनुसार परि -४ तक्ता अ अ.क्र. ३ येथे विहीत केलेल्या निकषाव्यतिरिक्त पोर्टेबल पंप संबंधीत जिल्हाधिकारी मंजूर करण्यास सक्षम असतील.

०८. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ८५ नुसार नगरपरिषदेस अग्निशमन विभागाच्या प्रयोजनासाठी दोन किंवा दोन पेक्षा जास्त नगरपरिषदेने एकत्र येऊन अग्निशमन सेवा विकसित करण्याबाबत निर्णय घेतल्यास, एकत्र येणाऱ्या सर्व नगरपरिषदांची एकूण लोकसंख्येच्या निकषाच्या आधारे अग्निशमन कर्मचारी संख्या व अग्निशमन साहित्य अनुज्ञेय राहिल.

**अग्निशमन विभाग कर्मचारी आराखडा**

०९. नगरपरिषदेच्या लोकसंख्येनुसार अग्निशमन विभागातील पदसंख्या खालीलप्रमाणे राहील.

**तक्ता - ब**

**लोकसंख्येनुसार अग्निशमन विभागातील पदसंख्या**

| अ.क्र. | पदनाम | क / ब वर्ग नगरपरिषदा ३० हजार ते १ लाख लोकसंख्या असलेल्या | अ वर्ग नगरपरिषदा १ ते २ लाख लोकसंख्या असलेल्या | अ वर्ग नगरपरिषदा २ ते ३ लाख लोकसंख्या असलेल्या |
|---|---|---|---|---|
| १ | अग्निशमन अधिकारी | निरंक | १ | १ |
| २ | सहा अग्निशमन अधिकारी | १ (ब वर्ग) | निरंक | १ |
| ३ | अग्निशमन स्थानक पर्यवेक्षक | १ (क वर्ग) | १ | १ |
| ४ | लिडिंग फायरमन | १ | २ | २ |
| ५ | ड्रायव्हर कम ऑपरेटर | २ | ४ | ५ |
| ६ | फायरमन | ४ | ६ | १२ |
| | एकूण :- | ८ | १४ | २२ |
| ७ | प्रशिक्षण घेतलेले जादा मदतनीस क | ५ | ७ | १० |

१०. अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांचे कामाचे वेळापत्रक परिशिष्ट-अ मध्ये विहित करण्यांत आले आहे. सोबतच्या वेळापत्रकामध्ये ७ दिवसाची पाळी विहीत केलेली आहे. त्यानुसार पाळीमध्ये बदल करण्यात यावा. अग्निशमन विभागातील सोबतच्या परिशिष्टामध्ये विहीत केलेल्या कामाचे वेळापत्रकामध्ये स्थानिक परिस्थितीनुसार मुख्याधिकारी हे अंशत: योग्य ते बदल करण्यास सक्षम राहतील.

११. अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्याचे कामाचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील.

अ) **३० हजार ते १ लाख लोकसंख्येच्या नगरपरिषद** - अग्निशमन विभागासाठी दिवसपाळीमध्ये पुरेसा आवश्यक कर्मचारी विहित केलेला आहे. रात्रपाळीमध्ये नियंत्रण कक्षामध्ये दोन कर्मचारी उपस्थित राहतील याची दक्षता घेण्यांत आली आहे. रात्रपाळीमध्ये आगीची वर्दी मिळाल्यानंतर आवश्यक कर्मचारी वर्ग बोलावून आगीच्या ठिकाणी गाडी पाठविणे शक्य होईल.

ब) **१ ते २ लाख लोकसंख्येच्या नगरपरिषद-** अग्निशमन विभागासाठी दिवसपाळी व रात्रपाळी विहित केलेली आहे. रात्रपाळीमध्ये आगीची वर्दी मिळाल्यानंतर कमीत कमी १ अग्निशमन गाडी वर्दी दिलेल्या स्थळी हजर राहून दुसरी गाडी पाठविणे आवश्यक असल्यास दिवसपाळीतील कर्मचाऱ्यांना बोलावून दुसरी गाडी पाठविणे शक्य होईल.

क) **२ ते ३ लाख लोकसंख्येच्या नगरपरिषद-** अग्निशमन विभागासाठी दिवसपाळी व रात्रपाळी विहित केलेली आहे. दिवसपाळीमध्ये व रात्रपाळीमध्ये आगीची वर्दी मिळाल्यानंतर घटनास्थळी किमान दोन गाड्या पाठविणे शक्य होईल इतपत पुरेसा कर्मचारी दोन पाळ्यांमध्ये ठेवलेला आहे.

ज्यावेळी रात्रपाळीमध्ये दिवस पाळीतील कर्मचाऱ्यांना बोलाविण्यात आलेले आहे त्यावेळी दुसऱ्या दिवशी त्यांना दिवसपाळीमध्ये सुट्टी देण्यात यावी.

१२. ज्या नगरपरिषदेमध्ये अग्निशमन गाडी आहे परंतु उपरोक्त परि-९ तक्ता ब नुसार पदे नाहीत, अशा नगरपरिषद आस्थापनेवर या स्थायी निदेशातील परिच्छेद २५ व २६ मध्ये नमूद केलेली कार्यवाहीच्या अधीन राहून अग्निशमन सेवेसाठी पदनिर्मितीचा निर्णय नगरपरिषदेने सर्वसाधारण सभेने घेवून प्रस्ताव या संचालनालयास पाठविल्यास त्यास महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ७६(१) नुसार मंजूरी देण्याची कार्यवाही प्राधान्याने करण्यांत येईल.

१३. अग्निशमन विभागातील उपरोक्त नमूद केलेल्या पदांची शैक्षणिक पात्रता व अर्हता, वेतनश्रेणी, सेवा भरती नियम परिशिष्ट-ब प्रमाणे राहतील. नगरपरिषद कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी अग्निशमन विभागातील लिडींग फायरमन, ड्रायव्हर कम ऑपरेटर व फायरमन या पदासाठी सरळसेवेत भरतीसाठी विहीत असलेले किमान पात्रता व अर्हता नगरपरिषद कर्मचाऱ्यांमधून अंतर्गत भरतीसाठी शिथिल करण्यांत आली आहे.

१४. अग्निशमन कर्मचाऱ्यांना निवासस्थान नगरपरिषदेकडून पुरविण्यात येणार आहे. या निवासस्थानासाठी घरभाडे कपात करण्यांत येऊ नये. मात्र विद्युत देयक व पाणी पट्टी कर्मचाऱ्याने स्वत: भरावी. अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांचे गणवेष सोबतच्या परिशिष्ट-क मध्ये विहीत करण्यात आले आहे. कर्मचाऱ्यांना दोन वर्षातून एकदा एक गणवेष देण्यात यावा. ऑन कॉल भत्ता लिडिंग फायरमनसाठी रु.२००/- ड्रायव्हर कम ऑपरेटरसाठी रु.१७५/-आणि फायरमनसाठी रु.१५०/- व या सर्वांसाठी गणवेश भत्ता रु.१००/-सोबतच्या परिशिष्ट-अ नुसार विहित केलेले मासिक कामाचे वेळापत्रकाचे पालन केल्यानंतर अनुज्ञेय आहे. अग्निशमन व आणिबाणी सेवेतील कर्मचारी कर्तव्य करीत असतांना त्यांच्या जिवितास धोका असण्याचा अधिक संभव आहे. त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांचा नगरपरिषदांमार्फत योग्य तो विमा उतरवता येईल.

**कर्मचारी भरती**

१५. परि -९ तक्ता ब मधील अ.क्र. १ ते ३ (अग्निशमन अधिकारी/ सहाय्यक अग्निशमन अधिकारी व अग्निशमन स्थानक पर्यवेक्षक) ही पदे राज्य पातळीवर संवर्ग निर्माण करण्याचे प्रस्तावित असल्याने सध्या त्यासाठी भरतीची कार्यवाही नगरपालिकेने करावयाची नाही.

१६. परि-९ तक्ता ब मधील अ.क्र. ४, ५, ६ पदांवरील (लिडिंग फायरमन, ड्रायव्हर कम ऑपरेटर, फायरमन) नियुक्तीसाठी भरतीची कार्यवाही नगरपालिकेने या संचालनालयाचे स्थाई निदेश क्र.२३ क्र.नप्रसं २००३/प्र.क्र.२५०/०४/४, दि. १९.१०.२००४ अन्वये अंतर्गत भरती पध्दतीने करावयाची आहे. जे कर्मचारी यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण करतील त्यांना अग्निशमन विभागातील नियुक्ती देता येतील. जे कर्मचारी वरील प्रशिक्षण पूर्ण करु शकणार नाहीत ते आपल्या मूळ पदावरच कार्यरत राहतील.

१७. वरील प्रशिक्षण सांताक्रूझ मुंबई येथे अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन यांच्या मार्फत आयोजित करण्यांत येतील. तक्ता ब मधील दोन पदांच्या सरळ सेवेने नियुक्तीसाठी ६ महिन्याचे प्रशिक्षण असते. नगरपरिषदेवर आर्थिक भार जास्त पडू नये यासाठी ६ महिन्याऐवजी ३ महिन्याचे प्रशिक्षण विहीत करण्यात आलेले आहे. अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन यांच्यामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या प्रशिक्षणात प्रथम प्रवेश घेण्याच्या तत्वावर प्रशिक्षणासाठी प्रवेश देण्यात येणार आहे. त्यामध्ये सुध्दा जादा वय असणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे जेणेकरुन इच्छूक कर्मचाऱ्यांना संधीचा फायदा घेता येईल. जे कर्मचारी विहीत निकषाप्रमाणे पात्र नसतील त्या कर्मचाऱ्यांना अग्निशमन सल्लागार प्रवेश नाकारु शकतील याची नोंद

घ्यावी. निवड केलेल्या उमेदवाराच्या प्रशिक्षणावरील खर्च नगरपरिषदेने नगरपरिषद फंडातून करावयाचा आहे. ज्या नगरपरिषदेमध्ये परिच्छेद - ९ प्रमाणे कर्मचारी वर्ग मंजूर नाही ते सुध्दा परिच्छेद १२ प्रमाणे प्रस्ताव पाठविल्यानंतर प्रशिक्षणासाठी आपले कर्मचारी पाठवू शकतात.

१८. राज्य अग्निशमन सल्लागार यांच्यामार्फत वित्तीय वर्षामध्ये अग्निशमन कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यांत येणाः प्रशिक्षणाचा तपशिल स्वतंत्ररित्या वेळोवेळी नगरपरिषदेस कळविण्यांत येईल.

१९. अग्निशमन विभागातील नियुक्त केलेल्या नियमित/मदतनीस कर्मचाऱ्यांना दर पाच वर्षांनी राज्य अग्निशमन प्रशिक्षण वें मुंबई यांनी विहित केलेला उजळणी पाठयक्रम / प्रशिक्षण (Refresher Course) पूर्ण करणे बंधनकारक आहे. जे अग्निशम कर्मचारी प्रशिक्षण पूर्ण करणार नाहीत त्यांची वेतनवाढ प्रशिक्षण पूर्ण करेपर्यंत रोखून धरावयाची आहे.

२०. उपरोक्त नमूद केलेल्या एकूण कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त नगरपरिषदेने वरील परि-९ तक्ता-ब मध्ये अ.क्र.७ येथे नमूद केल्याप्रमा मदतनीस कर्मचाऱ्याना सुध्दा प्रशिक्षणास पाठवावयाचे आहे. हे मदतनीस कर्मचारी नगरपरिषदेच्या अग्निशमन विभागाव्यतिरि कोणत्याही विभागात कार्यरत असू शकतात व मूळ विभागातच दररोज नेहमीचे काम करतील. मात्र आपत्कालीन प्रसंगी हे कर्मचा अग्निशमन विभागासाठी उपलब्ध केले जातील. त्यामुळे या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करुन ठेवावयाचे आहेत. या कर्मचाऱ्यांना च वर्षातून एकदा एक बॉयलर सुट देण्यात यावा. या प्रशिक्षण घेतलेल्या मदतीस कर्मचाऱ्यांना त्यांच्या पदाच्या विहित केलेल वेतनाव्यतिरिक्त वर्दीच्यावेळी तसेच महिन्यातून एकदा कवायत व प्रशिक्षणासाठी बोलाविण्यात यावे. त्यावेळी त्यांना गृहरक्षदला विहीत केलेल्या दराने भत्ता देण्यात यावा.

**अग्निशमन केंद्रासाठी आवश्यक जागा**

२१. नगरपरिषदांमध्ये अग्निशमन केंद्रासाठी आवश्यक जागा पुढीलप्रमाणे अपेक्षित आहे.

**तक्ता - क**

**लोकसंख्येनुसार अग्निशमन केंद्रासाठी आवश्यक जागा**

| अ.क्र. | वाहन | क / ब वर्ग नगरपरिषदा ३० हजार ते १ लाख लोकसंख्या असलेल्या | अवर्ग नगरपरिषदा १ ते २ लाख लोकसंख्या असलेल्या | अ वर्ग नगरपरिषदा २ ते ३ लाख लोकसंख्या असलेल्या |
|---|---|---|---|---|
| | जागा | चौरस मिटर | चौरस मिटर | चौरस मिटर |
| १ | एकूण किमान क्षेत्र | ७०० | १००० | १२०० |
| २ | बांधकामासाठी क्षेत्र | | | |
| | अ) वॉचरुम | ६.०० | ६.०० | ६.०० |
| | ब) ऑफिस | १६.०० | ३७.०० | ३७.०० |
| | क)पार्किंग बे | २ | ३ | ३ |
| | ड) ट्रेनिंग सेंटर | ० | ३७.०० | ३७.०० |
| | इ) स्टोअर | १२.०० | ३७.०० | ३७.०० |
| ३ | कर्मचाऱ्यासाठी निवास क्षेत्र | | | |
| | अ)अधिकारी निवास | १ अधिकाऱ्यासाठी | १ अधिकाऱ्यासाठी | १ अधिकाऱ्यासाठी |
| | ब) कर्मचारी निवास | ३ कर्मचाऱ्यांसाठी | ४ कर्मचाऱ्यांसाठी | ६ कर्मचाऱ्यांसाठी |

अग्निशमन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या निवासस्थानाचे क्षेत्र हे शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी सार्वजनि बांधकाम विभाग यांनी विहित केलेल्या निकषानुसार राहील.

२२. वरील परि-२१ तक्ता-क मध्ये नमूद केलेली अग्निशमन केंद्रासाठीची जागा ही कमीत कमी आहे. नगरपरिषदांना शक असल्यास यापेक्षा मोठ्या आकाराच्या अग्निशमन केंद्रासाठी भूखंड उपलब्ध करुन घ्यावा. अग्निशमन केंद्रासाठी जागा निवडता पुढीलप्रमाणे प्राधान्य देण्यांत यावे.

अ) नगरपरिषद कार्यालयाजवळ किंवा

ब) ज्या ठिकाणी वेळोवेळी सहज पाणीपुरवठा होऊ शकेल अशी जागा किंवा

क) रुग्णालयाजवळ किंवा

ड) वरील ठिकाणी जागा उपलब्ध नसल्यास अन्य सोईची जागा.

२३. अग्निशमन केंद्र आणि अधिकारी / कर्मचारी निवास यासाठी मार्गदर्शक आराखडे तयार करण्यांत आले असून ते अग्निशम सल्लागार, महाराष्ट्र शासन यांचेकडून उपलब्ध करुन घेण्यांत यावेत.

२४. वरील निकषाप्रमाणे अग्निशमन स्थानकांसाठी नगरपरिषदेकडे जागा उपलब्ध असेल तर अग्निशमन केंद्र/कार्यालयाच्या बांधकामासाठी नगरपरिषदांना ११ व्या वित्त आयोगातून विशेष अनुदानाची शासनाकडे मागणी करता येईल.

**२५. अग्निशमन व आणिबाणी सेवेसाठी उपलब्ध करावयाचा निधी**

अग्निशमन सेवेपासूनचे उत्पन्न अत्यल्प असते मात्र त्यावरील वाहनांचा खर्च व कर्मचारी आस्थापना खर्च हा जास्त असतो. त्यामुळे अग्निशमन सेवा ही तोटयात असते. अग्निशमन सेवेसाठी होणारा खर्च काही प्रमाणात वसूल व्हावा याकरीता अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन यांच्या शिफारशी विचारात घेऊन अग्निशमन सेवेपासून उत्पन्नाचे खालील नमूद केलेल्या स्त्रोतातून वसूल करण्याचे किमान दर सोबतच्या परिशिष्ट-ड मध्ये विहित करण्यांत आले आहेत.

१. अग्निशमन व आणिबाणी सेवेच्या व्यवस्थापनासाठी शासन अधिसुचना नगर विकास विभाग क्र.एमयुजी १०८९/१२८८/प्र.क्र.४१/९१/नवि-३२ दिनांक ०१.०४.१९९२ नुसार नगरपरिषदांनी मालमत्ता कराच्या किमान २ टक्के दराने अग्निशमन कर आकारावा.

२. अग्निशमन यंत्रणा उभारण्यासाठी व अग्निशमन सेवा सक्षम करण्याच्या दृष्टीने नगरपरिषदेतील हद्दीत होणाऱ्या नवीन इमारतींवर आकारावयाचे अग्निशमन सेवा विकास शुल्क (कॅपिटेशन फी)

३. नगरपरिषद क्षेत्रातील उंच इमारतीच्या आवारातील आग विझविण्याच्या यंत्रणेचे निरिक्षण हे सहामाही/ वार्षिक करावे लागत असल्यामुळे त्यांच्याकडून वसूल करावयाचे निरिक्षण शुल्क

४. ना हरकत प्रमाणपत्र व वार्षिक नूतनीकरण प्रमाणपत्र शुल्क (महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ भारतीय उत्स्फोटक कायदा, दि गॅस सिलेंडर नियम व दि पेट्रोलियम कायदा १९३४ नियम १९७६ नुसार )

५. विमा हक्क व पोलीस तपासासाठी अग्निशमन प्रमाणपत्र दर

६. औद्योगिक क्षेत्रामध्ये /नगरपरिषद क्षेत्राबाहेर लागलेल्या आगीमुळे संबंधीतांकडून वसूल करावयाचे दर.

७. नगरपरिषदेच्या हद्दीत अथवा हद्दीबाहेर अग्निशमन दलाकडील साधनसामुग्री दिल्यास आकारावयाचे दर

२६. उपरोक्त नमूद केलेले परिशिष्टामधील अग्निशमन शुल्क हे किमान आहे. सदरचे शुल्क हे अग्निशमन सेवा कार्यरत करण्यासाठी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन लागू करावेत. अग्निशमन शुल्क हे अग्निशमन कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्यावरील / अग्निशमन गाडीच्या इंधनावरील खर्च / अग्निशमन साहित्य विकत घेण्यासाठी आलेला खर्च यामधील होणारी वाढ विचारात घेऊन महागाई भत्यामध्ये झालेल्या वाढीच्या दरानुसार वेळोवेळी सोबतच्या परिशिष्टामध्ये अग्निशमन शुल्कामध्ये वाढ करण्यात यावी.

२७. नगरपरिषदेने अग्निशमन निधी हा स्वतंत्र निधी उभारण्यांत यावा. अग्निशमन निधीचा स्वतंत्र अभिलेखा ठेवण्यांत यावा. अग्निशमन शुल्कापासून मिळणारे उत्पन्न या निधीमध्ये ठेवण्यांत यावे. अग्निशम सेवेसाठी खर्च होणारी रक्कम जास्त असल्यास कमी पडणारी रक्कम नगरपरिषद निधीमधून प्रत्येक वर्षी जमा करण्यांत यावी.

२८. वरील स्थाई निदेशाचे वाचन नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत करण्यांत येऊन तशी नोंद कार्यवृत्तांतात घेण्यांत यावी.

(सुनील सोनी)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रत:

१) मुख्याधिकारी, नगरपरिषदा (सर्व)
२) जिल्हाधिकारी (सर्व)
३) अग्निशमन सल्लागार, राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, विद्यानगर, हंस भुग्रा मार्ग, सांताक्रुझ (पूर्व) मुंबई ४०००९८
४) प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन (सर्व)
५) सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

# परिशिष्ट `अ`

## दैनंदिन कामकाजाचे वेळापत्रक

| अ.क्र. | वेळ | कामे |
|---|---|---|
| | | **दिवस पाळी** |
| १ | ७.०० ते ७.४५ | रोल कॉल - शिफ्ट बदली / रनिंग/पी.टी. |
| २ | ७.४५ ते ८.४५ | गॅरेज व परिसराची साफसफाई, फायर टेंडर, स्मॉल गिअर, होज आणि ब्रँचेस, श्वसन उपकरणे रेस्क्यू टूल्स् इ.ची साफसफाई, पॉलिश, ऑलिंग, व टेस्टींग करणे (अर्धे कर्मचारी सुट्टीवर असतील) |
| ३ | ८.४५ ते ९.४५ | गॅरेज व परिसराची साफसफाई, फायर टेंडर, स्मॉल गिअर, होज आणि ब्रँचेस, श्वसन उपकरणे रेस्क्यू टूल्स् इ.ची साफसफाई, पॉलिश, ऑलिंग, व टेस्टींग करणे (अर्धे कर्मचारी सुट्टीवर असतील) |
| ४ | ९.४५ ते १२.४५ | फुट, हायड्रंट, होज, लॅडर ड्रिल, रोड, हायड्रंट टेस्टींग आठवड्यातून किमान एकदा |
| ५ | १२.४५ ते १५.४५ | अग्नि सुरक्षेसंबंधी चर्चासत्र (औद्योगिक वसाहत, सिनेमागृहे, शैक्षणिक संस्था वगैरे) (अर्धे कर्मचारी सुट्टीवर असतील) |
| ६ | १५.४५ ते १८.४५ | न.प मदतनीस कर्मचाऱ्यांना व होमगार्डसना अग्निशमन प्रशिक्षण देणे, मैदानी खेळ(अर्धे कर्मचारी सुट्टीवर असतील) |
| ७ | १८.४५ ते १९.०० | रोल कॉल - शिफ्ट बदली |
| | | **रात्र पाळी** |
| ८ | १९.०० ते २२.४५ | वॉचरुम ड्युटी |
| ९ | २२.४५ ते २.४५ | वॉचरुम ड्युटी (अर्धे कर्मचारी सुट्टीवर असतील) |
| १० | २.४५ ते ६.४५ | वॉचरुम ड्युटी (अर्धे कर्मचारी सुट्टीवर असतील) |
| ११ | ६.४५ ते ७.०० | वॉचरुम ड्युटी |

टीप :- १. अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांची दिवस व रात्रपाळीमध्ये ८ तासाच्या वर काम देता येणार नाही. वरीलप्रमाणे त्यांना सुटीचे नियोजन करण्यात यावे.

२. अग्निशमन विभागातील दिवसपाळीतील कर्मचाऱ्यांना स्थानिक परिस्थितीनुसार नगरपरिषदेच्या कामासाठी वापर करता येईल. तथापि आगीची वर्दी मिळाल्यानंतर भोंगा वाजल्यानंतर हे कर्मचारी अग्निशमन विभागामध्ये कार्यरत करता येतील.

## ३०,००० ते १,००,००० लोकसंख्येसाठी अग्निशमन केंद्र मासिक कामाचे वेळापत्रक

| पदाचे नांव | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सहाय्यक अग्निशमन अधिकारी ब वर्ग साठी | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु |
| अग्निशमन स्थानक पर्यवेक्षक क वर्ग साठी | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा |
| लिडींग फायरमन | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा |
| ड्रायव्हर कम ऑपरेटर-अ | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु |
| ड्रायव्हर कम ऑपरेटर-ब | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा |
| फायरमन-अ | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा |
| फायरमन-ब | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा |
| फायरमन-क | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा |
| फायरमन-ड | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा |

## १,००,००० ते २,००,००० लोकसंख्येसाठी अग्निशमन केंद्र मासिक कामाचे वेळापत्रक

| पदाचे नांव | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सहाय्यक अग्निशमन अधिकारी | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु |
| अग्निशमन स्थानक पर्यवेक्षक | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा |
| लिडींग फायरमन | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा |
| ड्रायव्हर कम ऑपरेटर-अ | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा |
| ड्रायव्हर कम ऑपरेटर-ब | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा |
| ड्रायव्हर कम ऑपरेटर-क | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा |
| ड्रायव्हर कम ऑपरेटर-ड | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा |
| फायरमन-अ | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा |
| फायरमन-ड | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा |
| फायरमन-ई | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु |
| फायरमन-ब | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा |
| फायरमन-क | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा |
| फायरमन-फ | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा |

टिप:- १) दि.पा. -- दिवस पाळी  २) रा.पा. -- रात्र पाळी  ३) सा.सु -- सार्वजनिक सुट्टी

# परिशिष्ट-अ

## २,००,००० ते ३,००,००० लोकसंख्येसाठी अग्निशमन केंद्रमासिक कामाचे वेळापत्रक

| पदाचे नांव | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अग्निशमन अधिकारी | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु. | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु. | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु |
| सहाय्यक अग्निशमन अधिकारी | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु. | रा.पा. | रा.पा. | रा.पा. | रा.पा. | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा |
| अग्निशमन स्थानक पर्यवेक्षक | रा.पा. | रा.पा. | रा.पा. | रा.पा. | सा.सु. | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा |
| लिडींग फायरमन-अ | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु. | रा.पा. | रा.पा. | रा.पा. | रा.पा. | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा |
| लिडींग फायरमन-ब | रा.पा. | रा.पा. | सा.सु. | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा |
| ड्रायव्हरकम ऑपरेटर-अ | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु. | रा.पा. | रा.पा. | रा.पा. | रा.पा. | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा |
| ड्रायव्हर कम ऑपरेटर-ब | रा.पा. | रा.पा. | सा.सु. | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा |
| ड्रायव्हर कम ऑपरेटर-क | दि.पा | सा.सु. | रा.पा. | रा.पा. | रा.पा. | रा.पा. | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा |
| ड्रायव्हर कम ऑपरेटर-ड | सा.सु. | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा. | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा |
| ड्रायव्हर कम ऑपरेटर-ई | रा.पा. | रा.पा. | रा.पा. | रा.पा. | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा. | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु |
| फायरमन-अ | रा.पा. | रा.पा. | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | रा.पा | रा.पा | रा.पा. | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | रा.पा | रा.पा | रा.पा. |
| फायरमन-ब | दि.पा | सा.सु | रा.पा. | रा.पा. | रा.पा. | रा.पा. | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा |
| फायरमन-क | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा. | रा.पा. | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा. | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा |
| फायरमन-ड | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा |
| फायरमन-ई | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा. | रा.पा. | रा.पा. | रा.पा. | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा |
| फायरमन-फ | रा.पा. | रा.पा. | रा.पा. | रा.पा. | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | रा.पा. | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | रा.पा |
| फायरमन-र | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा |
| फायरमन-ल | रा.पा. | रा.पा. | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा |
| फायरमन-त | दि.पा | सा.सु | रा.पा. | रा.पा. | रा.पा. | रा.पा. | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा |
| फायरमन-व | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा |
| फायरमन-श | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा. | रा.पा. | रा.पा. | रा.पा. | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा |
| फायरमन-स | रा.पा. | रा.पा. | रा.पा. | रा.पा. | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | रा.पा | सा.सु | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | दि.पा | सा.सु |

टिप:- १) दि.पा. -- दिवस पाळी २) रा.पा. -- रात्र पाळी ३) सा.सु -- सार्वजनिक सुट्टी

## प रि शि ष्ट - ब

### अग्निशमन विभागातील पदांची संवर्गनिहाय पदांची कर्तव्यं व जबाबदारी, किमान शैक्षणिक अर्हता व भरती पध्दत

| सांकेतांक | संवर्ग | पदनाम | कर्तव्य व जबाबदारी | गट क्रमांक / वेतनश्रेणी | किमान शैक्षणिक अर्हता | | भरती पध्दत | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सरळ-सेवेसाठी | पदोन्नतीसाठी | सरळसेवा/ अंतर्गत भरती | पदोन्नती |
| २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| FIR-५ | लिडिंग फायरमन | लिडिंग फायरमन | आग विझवणे आणि आग लागल्यास तिच्यापासून जिविताचे व मालमत्तेचे संरक्षण करणे. | क ३२००-४९०० | लागू नाही. | माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण व राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबईमधून फायरमन प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यक. मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक. जड वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक. फायरमन /वाहनचालक कम ऑपरेटर या पदावरील किमान सात वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. दर ५ वर्षांनी राज्यअग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई यांनी विहीत केलेला उजळणी पाठयक्रम/प्रशिक्षण (Refresh Course) पूर्ण करणे बंधनकारक. | लागू नाही. | १००% |
| वर नमूद केलेला पाठयक्रम/प्रशिक्षण (Refresh Course) पूर्ण करेपर्यंत वेतनवाढ रोखून धरण्यात येईल. | | | | | | | | |

टीप- अग्निशमन अधिकारी, सहाय्यक अग्निशमन अधिकारी व अग्निशमन स्थानक पर्यवेक्षक या पदांचा राज्यस्तरीय संवर्ग प्रस्तावित आहे.

| सांकेतांक | संवर्ग | पदनाम | कर्तव्य व जबाबदारी | गट क्रमांक / वेतनश्रेणी | किमान शैक्षणिक अर्हता | | भरती पध्दत | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सरळ-सेवेसाठी | पदोन्नतीसाठी | सरळसेवा/ अंतर्गत भरती | पदोन्नती साठी |
| २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| FIR-६ | फायरमन | फायरमन | आग विझवणे आणि आग लागल्यास तिच्यापासून जिविताचे व मालमत्तेचे संरक्षण करणे. | ड २७५०-४४०० | सरळसेवेसाठी- किमान माध्यमिक शालांत परीक्षा (एसएससी) उत्तीर्ण व शासनमान्य संस्थेकडून फायरमनचे प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यक.जड वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक.<br>शारीरिक पात्रता : किमान<br>१) उंची - किमान १६५ सें.मी.<br>२) छाती-८१ सें.मी. न फुगवता व फुगवून ८६ सें.मी.<br>३) वजन - ५० किलो<br>४) दृष्टी : चष्म्याशिवाय ५/५<br>न.प.कर्मचाऱ्यांसाठी : किमान सातवी उत्तीर्ण व शासनमान्य संस्थेकडून फायरमनचे प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यक.वयोमर्यादा : ४५ वर्षापेक्षा कमी<br>शारीरिक पात्रता : किमान<br>१) उंची - किमान १६५ सें.मी.<br>२) छाती-८१ सें.मी. न फुगवता व फुगवून ८६ सें.मी.<br>३) वजन - ५० किलो<br>४) दृष्टी : चष्म्यासह ६/६ किंवा चष्म्याशिवाय ५/५ वरील दोन्हींसाठी : दर ५ वर्षांनी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई यांनी विहीत केलेला उजळणी पाठयक्रम/ प्रशिक्षण (Refresher Course) पूर्ण करणे बंधनकारक. | लागू नाही. | न.प. कर्मचाऱ्यांना प्राधान्य. न.प. कर्मचारी उपलब्ध नसल्यास सरळसेवेने | लागू नाही. |

## प रि शि ष्ट - ब

## अग्निशमन विभागातील पदांची संवर्गनिहाय पदांची कर्तव्य व जबाबदारी, किमान शैक्षणिक अर्हता व भरती पध्दत

| अ.क्र. | सांकेतांक | संवर्ग | पदनाम | कर्तव्य व जबाबदारी | गट क्रमांक / वेतनश्रेणी | किमान शैक्षणिक अर्हता | | भरती पध्दत | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | सरळसेवेसाठी | पदोन्नतीसाठी | सरळसेवा/ अंतर्गत | पदोन्नती साठी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| ३ | FIR-७ | ड्रायव्हर कम ऑपरेटर | ड्रायव्हर कम ऑपरेटर | फायरमनवर नियंत्रण ठेवणे. वाहन चालविणे व आग आटोक्यात आणणे. लिडींग फायरमनच्या अनुपस्थितीत लिडींग फायरमनची कर्तव्ये बजाविणे. | क ३०५०-४५९० | सरळसेवेसाठी- किमान माध्यमिक शालांत परीक्षा (एसएससी) उत्तीर्ण व शासनमान्य संस्थेकडून फायरमनचे प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यक.<br>जड वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक.<br>शारीरिक पात्रता : किमान<br>१) उंची - १६५ सें.मी.<br>२) छाती-८१ सें.मी. न फुगवता व फुगवून ८६ सें.मी.<br>३) वजन - ५० किलो<br>४) दृष्टी : चष्म्याशिवाय ५/५<br>न.प.कर्मचाऱ्यांसाठी- किमान सातवी उत्तीर्ण व शासनमान्य संस्थेकडून फायरमनचे प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यक.<br>जड वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक.<br>वयोमर्यादा : ४५ वर्षापेक्षा कमी<br>शारीरिक पात्रता : किमान<br>१) उंची - १६५ सें.मी.<br>२) छाती-८१ सें.मी. न फुगवता व फुगवून ८६ सें.मी.<br>३) वजन - ५० किलो<br>४ दृष्टी : चष्म्यासह ६/६ किंवा चष्म्याशिवाय ५/५<br>वरील दोन्हींसाठी : दर ५ वर्षांनी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई यांनी विहीत केलेला उजळणी पाठयक्रम/प्रशिक्षण (Refresher Course) पूर्ण करणे बंधनकारक. | लागू नाही. | न.प. कर्मचाऱ्यांना प्राधान्य. न.प. कर्मचारी उपलब्ध नसल्यास सरळसेवेने | लागू नाही. |

टीप : वर नमूद केलेला पाठयक्रम/प्रशिक्षण (Refresh Course) पूर्ण करेपर्यंत वेतनवाढ रोखून धरण्यात येईल.

## परिशिष्ट-क

### अग्निशमन सेवा अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी गणवेश

प्रत्येक अधिकाऱ्यांसाठी खालीलप्रमाणे दर २ वर्षासाठी एकदा गणवेशासाठीचे साहित्य पुरविण्यात यावेत. काही साहीत्य हे विशिष्ट पदासाठी शिफारस करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | तपशिल | संख्या |
|---|---|---|
| | अधिकाऱ्यांसाठी | |
| १ | ॲपोलेट (सिंगल) १०X५ व्हॉईट मेटल २२ गेजचे | १ जोडी |
| २ | पिक कॅप दोन मेटल बटण व मोनोग्राम सह | १ नग |
| ३ | इम्पेलर्स १ / २ इंच डायमीटर व्हाईट मेटल | ८ नग |
| ४ | फायर ट्युनिक (ओपन कॉलर) नेव्ही ब्ल्यू कापडाची | १ नग |
| ५ | नेव्ही ब्ल्यू कापडाचे ट्राऊजर | २ नग |
| ६ | शू ॲन्कल थिक कॉटन मेड फुल साईज (फक्त फायर सब ऑफिसरसाठी) | १ नग |
| ७ | व्हाईट टेरी कॉटन टर्कीग शर्ट समोर दोन पाकीट, शोल्डर फ्लॅप व लिबर्टी कॉलर सह | २ नग |
| | वाहनचालकासाठी | |
| ८ | ड्रायव्हर आर्म बॅच (ड्रायव्हिंग व्हिल) व्हाईट मेटल (फक्त ड्रायव्हरसाठी) | २ नग |
| | कर्मचाऱ्यांसाठी वाहन चालकासह | |
| ९ | नेव्ही ब्ल्यू बॉयलर सुट सुती कापडाचे | १ जोडी |
| १० | फोर्ज कॅप रेड बँड सह, २ मेटल बटन | २ नग |
| ११ | सिकंदर टाईप हेलमेट कॉनकर्ड मेक | १ नग |
| १२ | गम बुट पूर्ण लांबीचे | १ नग |
| | सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी | |
| १३ | चांगल्याप्रतीचे टीशर्ट ज्यावर फायर ब्रिगेडचा लोगो छापलेला असेल | २ नग |
| १४ | प्रत्येकाच्या मापानुसार व्हॉईट ड्रील हाफ पॅन्ट तीन लूक्स व दोन साईड पॉकेट सह | २ नग |
| १५ | व्हॉईट कॅनव्हॉस बुट वूलन मोजे सहीत | १ जोडी |
| १६ | उत्तम प्रतीचा चामडी पट्टा २-१/२ इंच रुंदीचा तसेच ३-१/२ इंच X २-१/२ इंच १८ गेजचे मोनोग्राम केलेले पितळी बक्कल | १ नग |
| १७ | काळे चामड्याचे बूट क्रॅप रबर नॉन स्कीड टाईप निळ्या मोज्यासहीत | १ जोडी |
| १८ | अ) शोल्डर बॅच १८ गेजचे<br>ब) शोल्डर फ्लॅप | ४ नग<br>२ नग |
| १९ | नेम प्लेट (इंग्रजी व मराठी) | २ नग |
| २० | शिटी आणि लेनियार्ड नायलॉन गेड ३८ इंच लांब मरुन कलरचे | २ नग |

## परिशिष्ट-ड

### नगरपालिका क्षेत्रात किंवा क्षेत्राबाहेर अग्निशमन वाहने / अग्निशमन सेवा पुरविण्याबाबत सेवाशुल्क

| अ.क्र. | | वर्गवारी | शुल्क |
|---|---|---|---|
| १ | | अग्निशमन व आणिबाणी सेवेच्या व्यवस्थापनासाठी शासन अधिसुचना नगर विकास विभाग क्र.एमयुजी १०८९/१२८८/प्र.क्र.४१/९१/नवि-३२, दि. ०१.०४.१९९२ नुसार नगरपरिषदांनी मालमत्ता कराच्या किमान २ टक्के दराने अग्निशमन कर | |
| २ | | अग्निशमन सेवा विकास शुल्क (कॅपीटेशन फी) | |
| | अ | १५ मीटर पर्यंत निवासी इमारत | निरंक |
| | ब | १५ ते २४ मीटर पर्यंत निवासी इमारत | रु.१०/-प्रती चौ.मी.मंजूर क्षेत्रफळासाठी |
| | क | १५ मीटर पर्यंत अनिवासी इमारत | रु.२५/-प्रती चौ.मी.मंजूर क्षेत्रफळासाठी |
| | ड | १५ ते २४ मीटर पर्यंत अनिवासी इमारत | रु.४०/-प्रती चौ.मी.मंजूर क्षेत्रफळासाठी |
| ३ | | उंच इमारतीमधील कायमस्वरुपी अग्निशमन यंत्रणेचे निरीक्षण शुल्क | |
| | अ | १५ ते २४ मीटर पर्यंत निवासी इमारत | किमान रु.१००० किंवा रु.१/- प्रती चौ.मी. यापैकी अधिक असेल ते शुल्क |
| | ब | १५ ते २४ मीटर पर्यंत अनिवासी इमारत | किमान रु.२००० किंवा रु.२/- प्रती चौ.मी. यापैकी अधिक असेल ते शुल्क |
| ४ | | ना हरकत प्रमाणपत्र शुल्क व वार्षिक नूतनीकरण शुल्क (महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ भारतीय उत्स्फोटक कायदा, दि गॅस सिलेंडर नियम व दि पेट्रोलियम कायदा १९३४ नियम १९७६ नुसार) | |
| | अ | उपहारगृह, केरोसिन डेपो, व्हिडीओ सेंटर व इतर आस्थापनांसाठी ना हरकत | रु.१५/- प्रती चौ.मी.क्षेत्रफळासाठी किंवा कमीतकमी रु.१०००/- |
| | ब | उपहारगृह, केरोसिन डेपो, व्हिडीओ सेंटर, दुकाने व इतर आस्थापनांसाठी ना हरकत दाखल्याची वार्षिक नुतनीकरण शुल्क | रु.५/-प्रति चौ.मी.क्षेत्रफळासाठी किंवा कमीत कमी रुपये ५००/- |
| | क | प्रदर्शनीय मेळा, फटाका विक्रीसाठी सर्कस, फन फेअर व इतरांसाठी ना हरकत दाखला | रु.१०/- प्रती चौ.मी.क्षेत्रफळासाठी किंवा कमीतकमी रु.१०००/- |
| | ड | ज्वालाग्राही, पेट्रोलपंप किंवा विषारी वायूंचा साठा करणारे कंपन्यांसाठी ना हरकत दाखला | रु. २० प्रति चौ.मी.क्षेत्रफळासाठी व कमीत कमी रु.२०००/- |
| ५ | | विमा व पोलीस तपासासाठी अग्निशमन प्रमाणपत्र दर | |
| | अ | नगरपालिका क्षेत्रातील किंवा क्षेत्राबाहेरील निवासी | रु.५००/- |
| | ब | नगरपालिका क्षेत्रातील किंवा क्षेत्राबाहेरील अनिवासी व औद्योगिक | रु.२०००/- |
| ६ | | औद्योगिक क्षेत्रामध्ये /नगरपरिषद क्षेत्राबाहेर लागलेल्या आगीमुळे संबंधीतांकडून वसूल करावयाचे दर | |
| | अ | फायर इंजिन, वॉटर टँकर नगरपालिका क्षेत्राच्याबाहेर अग्निशमन सेवेसाठी | अ) ०३ तासापर्यंत रुपये ४०००/- व त्यानंतर प्रत्येक तासाला रुपये १०००/-<br>ब) रासायनिक आग विझविण्यासाठी वापरण्यात येणारा फोम कंपाऊंड डी.सी. पावडर संबंधीत कंपनीकडून त्यावेळेच्या फोम कंपाऊंड व डी.सी.पी.पावडरच्या रक्कम वसूल करण्यात यावी. |
| | ब | वरील फायर वाहने आग विझविण्या व्यतिरिक्त व्यावसायिक कारणास्तव हद्दीत अथवा हद्दीबाहेर मागितल्यास | पहिले सहा तास किंवा त्याचे भागास रु.१००००/- पुढील प्रत्येक एक तास किंवा त्याचे भागास रक्कम रुपये ३०००/- |
| | क | बंदोबस्त ड्युटी | अ) शासकीय कार्यक्रमासाठी व्ही.आय.पी.आले असतील तर अग्निशमन सेवाशुल्क आकारण्यात येवू नये.<br>ब) खाजगी कार्यक्रमासाठी व्ही.आय.पी.आले असल्यास कार्यक्रम संयोजकाकडून अ.क्र. ६ (अ) प्रमाणे शुल्क वसूल करण्यात यावे. |
| | ड | पोर्टेबल पंप भाडे तत्वावर | ०३ तासासाठी रुपये १०००/- व त्यानंतर प्रत्येक तासाला रुपये ५००/-प्रमाणे |
| | ई | वॉटर टँकर पोर्टेबल पंपासहित | प्रत्येक फेरीला (१० कि.मी.पर्यंत) रुपये १०००/- प्रमाणे |
| ७ | | नगरपालिकेच्या हद्दीत अथवा हद्दीबाहेर अग्निशमन दलाकडील खालील साधन सामुग्री दिल्यास | |
| | अ | ५० फुट होज कपलिंगसह, ब्रँचेस, अॅडाप्टर, पहार, १० फुटी २.५``, ४``व ६`` सक्शन होज, ३५ फुटी एक्सटेंशन लॅडर (लॅटर दुरुस्ती व वाहतुकी व्यतिरिक्त) (एक नगास) | पहिले सहा तास किंवा त्याचे भागास रुपये २५०/- |
| | ब | आग विझविण्याचे प्रशिक्षण (वाहतुकी व्यतिरिक्त) दोन / तीन तासाच्या कार्यक्रमाकरीता एका उमेदवारास | रुपये २५०/- |
| | क | खाजगी संस्थेमध्ये आग प्रतिबंधक उपाय योजनेबाबत दोन तासाच्या व्याख्याना करीता | रुपये ५००/- |